**<u>ठळक बातम्या</u>**

- देशाचे चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ जनरल अनिल चौहान सेवानिवृत्त, लेफ्टनंट जनरल एन. एस. राजा सुब्रमणी पदभार स्वीकारणार
- राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या दीडशेव्या तुकडीचा दीक्षांत संचलन समारंभ पुण्यात संपन्न
- गोवा स्थापना दिनानिमित्त राष्ट्रपती, प्रधानमंत्र्यांच्या शुभेच्छा, उपराष्ट्रपतींच्या उपस्थितीत विशेष कार्यक्रमाचं आयोजन

**आणि**

- पुण्यात भेसळयुक्त दारू प्रकरणात पोलीस आणि महाराष्ट्र उत्पादन शुल्क विभागाचे २२ कर्मचारी निलंबित

**<><><><><>**

देशाचे चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ जनरल अनिल चौहान आज सेवानिवृत्त झाले. देशाचे सर्वोच्च सैन्य अधिकारीपदाच्या त्यांच्या कार्यकाळाच्या समाप्तीचं प्रतीक म्हणून, नवी दिल्लीतल्या राष्ट्रीय युद्ध स्मारक इथं तिन्ही दलांनी त्यांना गार्ड ऑफ ऑनर दिला. यानंतर चौहान यांनी युद्ध स्मारकावर पुष्पचक्र अर्पण केलं. तिन्ही दलांच्या गार्ड ऑफ ऑनरनं सेवानिवृत्त होणं ही आपल्यासाठी सन्मानाची बाब असल्याची भावना चौहान यांनी यावेळी व्यक्त केली. आपला कार्यकाळ समाधानकारक आणि उत्कृष्ट असल्याचंही ते म्हणाले.  चौहान हे १९८१ मध्ये भारतीय लष्करात रुजु झाले होते, त्यांनी ४० वर्षांपेक्षा जास्त काळ लष्करात सेवा दिली. या कार्यकाळात त्यांनी अनेक महत्त्वाच्या पदांची जबाबदारी सांभाळली. त्यांच्या सेवेसाठी त्यांना परम विशिष्ट सेवा पदकासह अनेक पदकांनी सन्मानितही केलं गेलं.

चौहान यांच्यानंतर लेफ्टनंट जनरल एन. एस. राजा सुब्रमणी हे देशाचे नवे चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ म्हणून पदभार स्वीकारणार आहेत.

<><><><><>

राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या दीडशेव्या तुकडीचा दीक्षांत संचलन समारंभ आज पुण्यात खडकवासला इथं झाला. या तुकडीत १८ महिला कॅडेट्ससह ३५३ कॅडेट्सनी आपले प्रशिक्षण पूर्ण केलं. लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी हे पुनरीक्षण अधिकारी म्हणून या सोहळ्याला उपस्थित होते. यावेळी त्यांनी उपस्थितांना मार्गदर्शनही केलं. सध्याच्या वेगानं बदलत असलेल्या सुरक्षा विषयक वातावरणात सातत्यानं शिकत राहणं, परिस्थितीनुसार जुळवून घेणं आणि सकारात्मक दृष्टिकोन बाळगणं आवश्यक असल्याचं ते म्हणाले. सैनिकांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणं आणि त्यांचा विश्वास संपादन करणं हीच नेतृत्वाची खरी कसोटी असल्याचंही ते म्हणाले. हे प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण केलेल्या महिला कॅडेट्सच्या कामगिरीचंही त्यांनी कौतुक केलं. शौर्य, जिद्द आणि लष्करी उत्कृष्टता या गुणांना लिंगभेद नसतो असं ते म्हणाले. यानिमीत्तानं त्यांनी सर्व कॅडेट्स, त्यांचे कुटुंबीय, प्रशिक्षक आणि कर्मचाऱ्यांचं अभिनंदनही केलं. ऑपरेशन सिंदूर अद्याप सुरू असल्याचं ते या सोहळ्यानंतर बातमीदारांशी बोलताना म्हणाले. भविष्यातली युद्धं केवळ जमीन, समुद्र आणि हवाई क्षेत्रापुरती मर्यादित नसतील तर त्यात सायबर, अंतराळ आणि कॉग्निटिव्ह वॉरफेअरची भूमिकाही महत्त्वाची असेल असं ते म्हणाले.

<><><><><>

आज गोवा राज्याचा ४० वा स्थापना दिवस. आजच्याच दिवशी १९८७ मध्ये गोव्याला पूर्ण राज्याचा दर्जा मिळाला होता. गोवा राज्याच्या स्थापना दिवसानिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांनी गोव्याच्या जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत.

समृद्ध अशी सांस्कृतिक परंपरा आणि अतिथ्यशिलतेसाठी गोवा राज्य ओळखले जातं. त्याबरोबरच शिक्षण, उद्योग, स्टार्टअप आणि राज्यात सातत्यानं होत असलेल्या विकास कामांमुळे गोव्यानं देशात स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे, असं राष्ट्रपतींनी संदेशात म्हटलं आहे. गोवा राज्याच्या प्रगतीसाठी ज्यांनी योगदान दिलं त्या सर्वांचं स्मरण प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समाज माध्यमावरील संदेशात केलं. गोवा राज्य हे समृद्ध राज्य असून भविष्यातही त्याची समृद्धी वृद्धिंगत होईल आणि विकसीत भारताचं उद्दिष्ट्य साध्य करण्यात गोव्याची भूमिका महत्त्वाची आहे, असं त्यांनी म्हटलं आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी ही समाज माध्यमावर लिहिलेल्या संदेशातून गोव्यातील जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत. गोवा हे संस्कृती आणि वारसा याचं अनोखे प्रतिक असल्याचं त्यांनी संदेशात म्हटलं आहे. देशाच्या विकासात गोवा राज्याचं महत्त्वपूर्ण योगदान असल्याचंही त्यांनी नमूद केलं. दरम्यान, पणजी इथल्या कला अकदामीत राज्याच्या स्थापना दिवसानिमित्त आयोजित कार्यक्रमात उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन उपस्थित होते. गोवा राज्य हे देशातलं आदर्श राज्य असून या राज्यानं विकासाबरोबरच आपला समृद्ध असा सांस्कृतिक वारशाचं जतन केल्याचे गौरवोद्गार राधाकृष्णन यांनी काढले.

**<><><><><>**

केंद्र सरकारनं प्रस्तावित ऊस नियंत्रण आदेश २०२६ चा मसूदा मागे घेण्याच्या घेतलेल्या निर्णयाचं कौशल्य विकास आणि उद्योजकता राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) जयंत सिंह यांनी स्वागत केलं आहे.  शेतकरी, गूळ खांडसरी उद्योग क्षेत्र तसंच विविध भागधारकांनी केलेल्या सूचनांनाची गांभीर्यानं दखल घेत केंद्र सरकारनं या मसुद्यावर पुनर्विकार करण्याचा निर्णय घेतल्याचं त्यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. यातून संवादावर आधारित धोरण निर्मितीबद्दलची सरकारची वचनबद्धता दिसून येते असंही त्यांनी म्हटलं आहे.

<><><><>

पुणे इथे भेसळयुक्त दारू प्यायल्यामुळे १४ जणांचा मृत्यू झाल्या प्रकरणी पुणे आणि पिंपरी-चिंचवड पोलीस विभाग तसंच, महाराष्ट्र राज्य उत्पादन शुल्क विभाग अशा एकूण २२ कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आलं आहे. भेसळयुक्त दारूच्या अवैध पुरवठ्याला आळा घालण्यासाठी अपयश ठरल्याबद्दल ही कारवाई झाली आहे. यात ९ पोलीस कर्मचारी आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या १३ कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. या प्रकरणात आतापर्यंत ८ जणांना अटक करण्यात आली असून तपास सीआयडीकडे सोपवण्यात आला आहे.

<><><><>

बिहारमध्ये वादळ, पाऊस आणि वीज कोसळण्याच्या वेगवेगळ्या घटनांमध्ये किमान सात जणांचा मृत्यू झाला आहे. गयामध्ये तीन, तर औरंगाबादमध्ये दोन जणांचा मृत्यू झाला आहे. याव्यतिरिक्त, सारण आणि खगडिया जिल्ह्यांमध्ये प्रत्येकी एका मृत्यूची नोंद झाली आहे. मुख्यमंत्री सम्राट चौधरी यांनी मृतांच्या कुटुंबांना प्रत्येकी ४ लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली आहे.

<><><><>

महाराष्ट्रात विदर्भ, हरियाणा, पंजाब, दिल्ली, राजस्थान आणि छत्तीसगड इथं आज मेघगर्जना आणि गारपिटीसह वादळी पावसाची शक्यता भारतीय हवामान विभागानं वर्तवली आहे. उत्तर प्रदेशचा पश्चिम भाग, बिहार, ओदिशा, तामिळनाडू, पुद्दुचेरी, कारिकल आणि अंदमान-निकोबार द्विपसमूहात आज मुसळधार पावसाचा अंदाज आहे. आसाम, मणिपूर, मिझोरम, मेघालय, त्रिपुरा, नागालँड आणि कर्नाटकचा समुद्रकिनारी भागातही विजांच्या कडकटासह मेघगर्जनेसह पावसाची शक्यता आहे. मध्य प्रदेशचा पश्चिमकेडचा काही भाग आणि तेलंगणा इथं उष्णतेची लाट कायम राहण्याची शक्यता आहे.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत उद्या होणाऱ्या अंतिम सामन्यात गुजरात टायटन्स विरुद्ध रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांच्यात लढत होणार आहे. काल राजस्थान रॉयल्स विरुद्ध झालेल्या सामन्यात गुजरातच्या संघाने राजस्थानवर ७ गडी राखून विजय मिळवला. राजस्थान रॉयल्सने निर्धारित २० षटकांत ६ गडी गमावून २१६ धावा केल्या होत्या. गुजरातने हे लक्ष्य एकोणिसाव्या षटकातच ७ गडी राखून पूर्ण केलं.

**<><><><><>**

सौदी हज आणि उमराह मंत्रालयानं भारतीय हज मिशनला पहिल्यांदाच हज समन्वय आणि संपर्क व्यवस्थेतल्या उत्कृष्टतेसाठीच्या दोन प्रतिष्ठित लब्बैतुम या पुरस्कारनं सन्मानित केलं. अल्पसंख्याक व्यवहार मंत्री किरेन रिजिजू यांनी समाज माध्यमावरून याबाबतची माहिती दिली. देशानं हज यात्रेचं केलेलं यशस्वी आयोजन म्हणजे, अल्पसंख्याक व्यवहार मंत्रालय, भारतीय हज समिती, सौदी अरेबियातले भारताचे राजदूत तसंच जेद्दाह मधील्या महावाणिज्यदूतांच्या नेतृत्वात राबललेल्या भारतीय हज मिशनमधल्या समन्वयाचं प्रतीक आहे असंही त्यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

म्यानमारचे राष्ट्रपती यू मिन आंग ल्हाइंग याचं आज पाच दिवसांच्या भारत भेटीसाठी बोधगया इथं आगमन झालं. बिहारचे कृषी मंत्री विजय कुमार सिन्हा यांनी त्यांचं स्वागत केलं. आपल्या भेटीच्या पहिल्या दिवशी त्यांनी महाबोधी मंदिरामध्ये आणि ऐतिहासिक सुजाता मंदिरात प्रार्थना केली. ते बोधगयामधल्या म्यानमारच्या विविध बौद्ध मठांनाही भेट देणार आहेत. राष्ट्रपती यू मिन आंग ल्हाइंग यांच्यासोबत त्यांचे वरिष्ठ अधिकारी आणि बौद्ध प्रतिनिधींचा समावेश असलेलं एक उच्चस्तरीय शिष्टमंडळ देखील भारत भेटीवर आलं आहे. भारत आणि म्यानमारमधले ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि बौद्ध वारशाशी जोडलेले संबंध अधिक दृढ करणं हा त्यांच्या भारत भेटीचा उद्देश आहे.

<><><><><>

सिंगापूर इथं आंतरराष्ट्रीय सामरिक अभ्यास संस्थेनं आयोजित केलेल्या शांगरीला संवाद कार्यक्रमात संरक्षण सचिव राजेशकुमार सिंह सहभागी झाले होते. या संवादात सहभागी झालेल्या इतर देशांच्या वरीष्ठ संरक्षण अधिकाऱ्यांशी त्यांनी द्विपक्षीय चर्चा केली. सिंह यांनी नेदरलँडच्या संरक्षण सचिव डिलान येशिलगोज-झेगेरियस यांची भेट घेत त्यांच्याशी विस्तृत चर्चा केल्याची माहिती संरक्षण मंत्रालयानं समाज माध्यमावरील संदेशातून दिली. उभय नेत्यांमध्ये भारत-नेदरलँड्स संरक्षण सहकार्य अधिक बळकट करणं, लष्करांमधील परस्पर संबंध दृढ करणं तसेच संरक्षण उद्योग क्षेत्रातील सहकार्याच्या नव्या संधींचा शोध घेणं या मुद्द्यंवर चर्चा झाली.

<><><><><>

इराणशी सुरु असलेल्या युद्धविरामाची मुदत वाढवण्याच्या सर्व शक्यता पडताळून पाहण्यासाठी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आपल्या सल्लागारांसोबत २ तास चर्चा केली, परंतु कोणताही ठोस निर्णय झाला नाही. कोणताही शांतता करार होण्यासाठी इराणने प्रथम होर्मूझ समुद्रधुनीचा मार्ग खुला केला पाहिजे आणि कोणतंही अण्वस्त्र न बनवण्याची हमी दिली पाहिजे असं ट्रम्प यांनी बैठकीनंतर वार्ताहरांना सांगितलं.

<><><><><>

पश्चिम आशियातला संघर्ष थांबवण्याचे प्रयत्न अयशस्वी झाल्यास अमेरिका इराण विरुद्ध पुन्हा एकदा लष्करी कारवाई सुरु करेल असं अमेरिकेचे संरक्षणमंत्री पीट हेगसेठ यांनी म्हटलं आहे. जगभरात जिथे गरज पडेल तिथे लष्करी कारवाई करण्याची क्षमता अमेरिकेकडे आहे असं त्यांनी सांगितलं.

//<><><><><>//